दिग्दर्शकांना फोन करणे, त्यांना प्रत्यक्ष भेटायला जाणे, ऑडिशन्स देणे हे सगळं सुरू झालं... हळूहळू छोटी-मोठी कामं मिळायला लागली... सह्याद्री वाहिनीवरची 'सारीपाट', 'चोरावर मोर' या मालिकेत तिने कामे केली. दरम्यानच्या काळात सब टी.व्ही.वरच्या 'बंदा ये बिंधास्त है' या मालिकेचं सूत्रसंचालन केलं... या क्षेत्रात यश मिळत होतं. पण संघर्ष सुरूच होता. कधी कधी महिन्यातले पाच / सहा दिवसच काम असायचं... त्यामुळे मुंबईत मन रमत नव्हतं... त्यानंतर तिने पुण्याला यायचा निर्णय घेतला. पुण्याला आल्यावर पंडित ऑटोमध्ये नोकरी केली. नोकरी करता करता बाबांबरोबर 'गंमत-जंमत'चे प्रयोग सुरू होतेच.

आता तिला खऱ्या अर्थाने आपल्या कलाकारामधील वाट



दिसायला लागली. नोकरी सोडून आता तिने एकपात्री प्रयोगामधून किस्से, नकलांचे कार्यक्रमही करायला सुरुवात केली. 'गेम शो' हाही मनोरंजनाचा प्रकार तिने सुरू केला. दूरदर्शनने लोकप्रिय केलेला 'गेम शो' हा प्रकार चैतालीने घराघरात प्रत्यक्ष पोहोचवला आहे. चैतालीच्या मते आपल्या रोजच्या आयुष्यात घडणाऱ्या काही घटना आयुष्यभर स्मृतीत जतन केल्या जातात. हे प्रसंग साजरे करण्याच्या प्रत्येकाच्या कल्पना वेगळ्या असतात. मात्र, हे क्षण सगळ्यांनी एकत्र धमाल साजरे करायचे असतील, तर 'गेम शो'ला पर्याय नाही. त्यात सर्व वयोगटांतील माणसं सहभागी होऊ शकतात. वेगवेगळे मनोरंजक खेळ खेळताना वयाचाही विसर पडतो. कल्पनाशक्तीला वाव मिळतो, नवी माहिती मिळते, ज्ञानात भर पडते.

या एकपात्री प्रयोगाकडे वळण्याचे संपूर्ण श्रेय ती मकरंद टिल्लू आणि सदानंद चांदेकरसरांना देते. त्यांनी तिच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण केल्याचे ती सांगते. या दोघांना चैताली प्रेरणास्थानी मानते. त्याचेच फलित म्हणजे आज 'गेम शो' या तिच्या कार्यक्रमाला प्रचंड प्रतिसाद मिळताना दिसतो. आज अशा विनोदी पद्धतीने एकपात्री प्रयोग करणाऱ्यांमध्ये तरुण मुलींचे प्रतिनिधित्व करणारी ती एकटी कलाकार आहे. एका दृष्टीने या गोष्टीचा तिला आनंदही होतो; पण त्याचबरोबर खंतही वाटते. आपल्याला कोणीतरी स्पर्धक हवा, असे तिला मनापासून वाटते.

एकपात्री प्रयोग म्हणजे काय? एकपात्री प्रयोग का करावासा वाटला? या संदर्भात चैतालीच्या मते कोणतेही नेपथ्य किंवा रंगमंचीय साधनांसाठी न अडणारा, कोणत्याहीक्षणी कल शकणारा अगदी एव्हरेडी प्रयोग तो एकपात्री प्रयोग! पुढे ती सांगते, 'आपल्याला दरवेळी नायिकेचीच भूमिका मिळेल. असा आपला चेहरा नाही. त्यापेक्षा एकपात्री प्रयोगात आपल्याला झोकून देऊन काम करता येऊ शकेल, असा आत्मविश्वास वाटला. एकपात्रीमध्ये सर्वदृष्टींनी आपणच फोकस असतो. दुसरं म्हणजे आपल्या सोयीनुसार आपण तारखा ठरवू शकतो. हा मुलींच्या दृष्टीने व्यावहारिक फायदाही आहे. या सगळ्यांचा विचार करूनच मी हे एकपात्रीचे आव्हान स्वीकारले आहे.

आपल्या कार्यक्रमांमधून फक्त विनोदी वातावरण असते. लोकांनी हसत यावे आणि तणावमुक्त अवस्थेत लोकांनी हसत घरी जावे, आस चैतालीचा दृष्टिकोन असतो. मुख्य म्हणजे लोकांनी कार्यक्रमाचा आनंद घेतला पाहिजे, असे तिला मनापासून वाटते. म्हणूनच प्रत्येक गोष्टींमध्ये विनोद शोधण्याची तिची वृत्ती असते. गंभीर विषय लग्न, डोहाळजेवण यांसारखे विषय विनोदी पद्धतीने ती सादर करते. कार्यक्रमामध्ये फूल टू धमाल असते. हा नवीन पिढीचा दृष्टिकोन बरंच काही सांगून जातो.

कोणताही प्रसंग सादर करताना चैतालीचे निरीक्षण सूक्ष्म असते. पोलीस हवालदार सकाळी लोकांवर ओरडून बोलणारा असतो आणि संध्याकाळी तो मरगळलेला, थकलेला जाणवतो. हा आवाजातील बदल, शरीराच्या हालचाली ती अतिशय नेमक्या पद्धतीने दाखविते. एक मुलगी. ही भूमिका करतेय असं जाणवत नाही, तर प्रत्यक्ष पुरुष हवालदाराच समोर उभा आहे, असे जाणवते. अशा अनेक प्रसंगांना तिला रसिकांची दाद मिळाली आहे. चैताली सांगते, 'प्रत्यक्ष प्रयोगाच्यावेळी मी अगदी बिनधास्तपणे व्यासपीठावर वावरत असते. स्त्री असूनही पुरुषासारख्या लकबी करणे हे माझे वेगळेपण रसिकांना भावते!

आपला प्रत्येक कार्यक्रम पाहिलाच आहे, अशाच पद्धतीने